# | शंकराची आरती |

लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा।
वीषें कंठी काळा त्रिनेत्रीं ज्वाळां॥
लावण्यसुंदर मस्तकीं बाळा।
तेथुनियां जळ निर्मळ वाहे झुळझुळां ॥ 1 ॥
जय देव जय देव जय श्रीशंकरा॥
आरती ओवाळूं तुज कर्पुरगौरा ॥धृ.॥

कर्पुरगौरा भोळा नयनीं विशाळा।
आर्धांगीं पार्वती सुमनांच्या माळा।
विभुतीचें उधळण शितिकंठ नीळा।
ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ॥ जय. ॥ 2 ॥

देवी दैत्यीं सागरमंथन पैं केलें।
त्यामाजी जें अवचित हळाहळ उठिलें।
तें त्वां असुरपषं प्राशन केलें।
नीळकंठ नाम प्रसिद्ध झालें॥ जय. ॥ 3 ॥

lifehackermarathi.com

# | शंकराची आरती |

व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी।
पंचानन मनमोहन मुनिजनसुखकारी।
शतकोटीचें बीज वाचे उच्चारी।
रघुकुलतिलक रामदासा अंतरी॥
जय देव जय देव जय श्रीशंकरा ॥ 4 ॥

## -- आरती समाप्त --

lifehackermarathi.com

lifehackermarathi.com